**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 11/07/2025

आरोपी लोकसेवक चंद्रकांत इंद्रजीत चव्हाण, वय ३५ वर्ष ,पद. मुख्याधिकारी (वर्ग १) नेमणूक नगरपरिषद, माजलगाव जि.बीड, रा. पिताजी नगरी,माजलगाव जि.बीड यांनी तक्रारदार यांचेकडे 6,00,000/- (सहा लाख) रुपये लाचेची मागणी करुन स्वत:चे स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे माजलगाव, बीड येथे गुरनं 255/2025 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक - चंद्रकांत इंद्रजीत चव्हाण, पद. मुख्याधिकारी (वर्ग १) नेमणूक नगरपरिषद, माजलगाव जि.बीड, रा. पिताजी नगरी,माजलगाव जि.बीड |
| लाच मागणी रक्कम | :- | 12,00,000/- (बारा लाख रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 6,00,000/- (सहा लाख रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | :-<br>:- | श्री. केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी महाराष्ट्र शासनाच्या नगर उत्थान अभियान योजने अंतर्गत, नगरपरिषद माजलगावातील केलेल्या सिमेंट रस्त्याचे कामाचे बिल दोन करोड काढल्याच्या मोबदल्यात ३ % असे ६,००,०००/- रुपये व राहिलेल्या उर्वरित कामांमधील रस्त्याचे बाजूचे अतिक्रमण काढून, अडथळे दूर करून देण्यासाठी ६,००,०००/- असे एकूण १२,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली. |
| थोडक्यात माहिती | :- | दिनांक १०/०७/ २०२५ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची तक्रारदार व पंच यांच्या समक्ष आलोसे श्री. चंद्रकांत इंद्रजीत चव्हाण यांच्याकडे त्यांचे घरी पिताजी नगरी येथे पाठवून लाचमागणी पडताळणी केली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार यांच्या तक्रारी मधील शासकीय कामासाठी १२,००,०००/- रुपये, (बारा लाख रुपये) लाच रकमेची मागणी करून, त्यातील ५० % रुपये ६,००,०००/- तात्काळ घेऊन येण्याचे सांगितले व उर्वरित ६,००,०००/- रुपये उद्या दि.११/०७/२०२५ रोजी देण्याचे ठरले होते. त्या अनुषंगाने दिनांक १०/०७/२०२५ रोजी आलोसे यांच्या घरी पिताजी नगरी येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडून पंचासमक्ष ६,००,०००/- रुपये, त्यांचे राहते घरात स्वतः स्वीकारले. असता आलोसे यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले आहे.<br>गुन्हयातील आरोपी लोकसेवक विरुध्द पो.स्टे.माजलगाव, बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद आरोपी लोकसेवक यांना अटक करुन तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक तथा पोलीस उप अधीक्षक श्री.सुरेश ह. नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. केशव दिंडे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस हवालदार अशोक नागरगोजे, राजेंद्र सिनकर यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1) spacbaurangabad@mahapolice.gov.in , 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923247986

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

11/7/2025

नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग